सन २०१५-१६ करिता राज्य योजनेतंर्गत "संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या" (४४१५००११) या योजनेचा चालू बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१५/प्र.क्र.१७३/फ-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ३० जानेवारी, २०१६

वाचा :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.०४.२०१५.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.५७/२०१५-१६/४८८, दि.२०.०६.२०१५.
३) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एफडीएम-२०१५/प्र.क्र.१७३/फ-२, दि.०४.०७.१५.
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प-३, दि.०१.०१.२०१६
५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१२.०१.२०१६

प्रस्तावना :-

सन २०१५-१६ करिता "संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या" (४४१५ ००११) या योजनेकरिता एकूण रु.६६.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून रु.४६.२० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला होता. सदर योजनेअंतर्गत मंजूर असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने रु.६६.०० लक्ष रक्कमेचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून शासनास प्राप्त झाले होते. प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने एकूण रु.३२.३४ लक्ष इतका निधी संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला आहे.

२. आता, सदर योजनेअंतर्गत उर्वरित असलेला विना अर्थसंकल्पित रु.१९.८० लक्ष इतका निधी सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. पूरक मागणीद्वारे अर्थसंकल्पित झालेल्या निधीपैकी ०२ मजूरी या उद्दिष्टांतर्गत १०० % तर उर्वरित उद्दिष्टांतर्गत ५० % मर्यादेत निधी वितरणास वित्त विभागाने संदर्भ क्र.५ येथील दि.१२.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये मंजूरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने, सदरप्रमाणे निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

३. वित्त विभागाच्या दि.०१.०१.२०१६ रोजीच्या व दि.१२.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकामध्ये पूरक मागणीद्वारे अर्थसंकल्पित निधीच्या अनुषंगाने निधी वितरणाच्या दिलेल्या सुचना विचारात घेता, सन २०१५-१६ करिता "संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या" (४४१५००११) या लेखाशीर्षाअंतर्गत वित्त विभागाच्या सुचनांनुसार उर्वरित **रु.२१.२६ लक्ष (०२ मंजूरी - १९.६८ लक्ष, २१ पुरवठा व सामग्री - १.५८ लक्ष)** इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. तरी सदर प्रमाणे BEAMS प्रणालीवर आवश्यकतेप्रमाणे पुनर्वितरण करावे.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. मागील वर्षी सदर योजनेकरिता वितरित केलेल्या निधीच्या विनयोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ वरील दि.१७.०४.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखिल दक्षता घ्यावी.

५. सदर योजनेवर होणारा खर्च मागणी क्र. सी-४४१५ प्रधान शिर्ष - कृषि संशोधन व शिक्षण यावरील भांडवली खर्च, ०६ वनीकरण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनेतंर्गत योजना, ००४ संशोधन, (००)(०१) संशोधन केंद्र आणि प्रायोगिक चाचण्या व क्षेत्रविषयक चाचण्या (राज्य) (४४१५००११) या लेखा शिर्षाखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा संदर्भ क्र.१ वरील दि.१७.०४.२०१५ रोजीचा शासन निर्णय तसेच वित्त विभागाचे संदर्भ क्र.५ वरील दि.१२.०१.२०१६ रोजीचे परिपत्रक आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र/१००८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५.०५.२००९ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१३०१२३५१२५५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.01.30 12:34:59 +05'30'

(डी.एल.थोरात)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) मुख्य वनसंरक्षक (संशोधन), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

५) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
६) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
९) जिल्हा कोषागार अधिकारी नागपूर / पूणे
१०) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
११) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.